नियमीत दिवाणी मुकदमा क्र.११४/२०१७ मधील नि. २८ वरील आदेश

{श्री. शिवराम गावडे वगैरे –वादी वि. श्री. शिवाजी गावडे वगैरे –प्रतिवादी }

१. अर्ज व म्हणणे वाचून पाहीले. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रकिया संहिता आदेश १४ नियम ५ नुसार दाव्यात जादा मुद्दे काढण्याकरीता दिलेला आहे.

२. प्रतिवादींचे अर्जातील कथन की, वादी यांनी दाव्याचे परिच्छेद नं. २ मध्ये दावा जमिन व दावा इमले हे त्यांच्या वैयक्तीक मालकी व कब्जाभोग्याचे असल्याने नमुद केले आहे. परंतु तशा प्रकारचा मुद्दा काढण्यात आलेला नाही . तसेच प्रतिवादींनी कैफियतीमध्ये दाव्याला मुदतीच्या कायद्याची बाधा येते अशी हरकत उभारलेली आहे . तसेच वादीकडुन रक्कम रुपये १०,०००/– नुकसान भरपाई मिळावी अशी मागणी केलेली आहे. परंतु तशा प्रकारचे मुद्दे काढण्यात आलेले नाहीत. त्यामुळे प्रतिवादी यांनी अर्जात नमुद केल्याप्रमाणे जादा मुद्दे काढण्यात यावेत अशी विनंती केली आहे.

३ वादी यांनी सदर अर्जावरच आपले म्हणणे दाखल करुन अर्जास हरकत घेतली आहे. वादी यांचे म्हणणे की, प्रतिवादी यांनी अर्जात केलेली मागणी चुकीची आहे . प्रतिवादींनी मागणी केल्याप्रमाणे मुद्दे काढण्याची आवश्यकता नाही. दाव्यामध्ये काढलेले मुद्दे योग्य आहेत. मुळात प्रतिवादींचा दावा मिळकतीकडे कोणताही हक्कसंबंध नाही . त्यामुळे अर्ज नामंजुर करण्यात यावा अशी विनंती वादीतर्फे करण्यात आली आहे.

४ प्रस्तुतचा दावा वादी यांनी हक्कस्थापना , कायमची ताकीद व आज्ञार्थी ताकीदीसाठी दाखल केलेला आहे. वादी यांची दाव्यातील कथने पहाता दावा परिच्छेद नं. ३ मध्ये असे नमुद केले आहे की , प्रतिवादी नं. १ ते ३ यांचा दावा इमल्याकडे कोणत्याही प्रकारचा हक्कसंबंध नसताना प्रतिवादी क्र . १ ते ३ यांनी अरेरावीने दावा इमल्यामधील काही भागाचा कब्जा बेकायदेशीररित्या बळकावलेला आहे. तसेच वादींनी विनंती कलम–क मध्ये अशी विनंती केली आहे की , दावा इमल्याचा खुला कब्जा प्रतिवादींनी वादींना द्यावा अशी प्रतिवादींना आज्ञार्थी ताकीद व्हावी. यावरुन असे दिसून येते की, वादी यांनी सदरचा दावा, दावा मिळकतीचा खुला कब्जा प्रतिवादी यांचेकडून मिळवणेकरीता आज्ञार्थी ताकीदीसाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी कैफियत (नि.१९) वर दाखल केलेली आहे. कैफियतीमधील परिच्छेद क्र. ६ मध्ये असे नमुद केले आहे की, दावा इमला हा प्रतिवादी यांचेकडे वारसा हक्काने आलेला आहे. प्रतिवादी हे दावा इमल्यात फार पूर्वीपासुन वास्तव्याला होते. वादी यांचे दाव्यातील प्रतिवादी यांनी दावा इमल्याचा काही भाग

बळकावला हे विधान खोटे आहे. दावा व कैफियतीतील कथनांवरुन हे स्पष्ट होते की, दावा इमल्यामध्ये सध्या प्रतिवादी यांची वहिवाट आहे व वादी यांनी दावा इमल्याचा खुला कब्जा मिळणेसाठी दाद मागितलेली आहे . अशा परिस्थितीमध्ये दावा मिळकतीमध्ये वादीची कब्जेवहिवाट आहे किंवा नाही याबाबतचा मुद्दा काढणे आवश्यक नाही. परंतु प्रस्तुत दाव्यात वादीने अशी विनंती केलेली आहे की, दावा जमिन व दावा इमले हे वादीचे मालकीचे आहेत अशी हक्कस्थापना करण्यात यावी. त्यामुळे दावा मिळकतीच्या मालकीबाबतचा मुद्दा काढणे आवश्यक असल्याचे दिसून येते.

५. प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जामध्ये असे कथन केले आहे की , कैफियतीतील पान क्र. २ ओळ क्र. ५ मध्ये '' दाव्याला मुदतीच्या कायद्याची बाधा आहे'' अशी हरकत उभारलेली आहे. प्रतिवादी यांनी कैफियतीमध्ये असे कथन केले आहे की , प्रतिवादी यांचे दाव्या इमल्यातील कब्जाभोग्य हे सन १९९१ पूर्वीपासूनचे आहे. परंतु वादी यांनी दाव्यामध्ये असे कथन केले आहे की , १ वर्षापासून दावा इमल्याचा काही भाग प्रतिवादी यांनी बळकावला आहे. त्यामुळे दावा इमल्यातील प्रतिवादी यांचे कब्जाभोग्य हे सन १९९१ च्या पूर्वीपासून असल्यामुळे सदर दाव्यास मुदतीच्या कायद्याची बाधा येते. कैफियतीमधील सदर कथने पहाता त्याबाबत मुदतीचा मुद्दा काढणे आवश्यक असल्याचे दिसून येते.

६. प्रतिवादी यांनी असे कथन केले आहे की, त्यांनी कैफियत परिच्छेद क्र. १० मध्ये नुकसान भरपाई रक्कम रुपये १० ,०००/- ची मागणी केलेली आहे . त्यामुळे त्याबाबतचा मुद्दा काढणेबाबत विनंती केलेली आहे. परंतु प्रतिवादी हा नुकसान भरपाईस पात्र आहे की नाही ते न्यायालयाच्या विवेकाधिकारात येत असल्यामुळे तसा मुद्दा काढण्याची आवश्यकता आहे असे दिसून येत नाही. त्यामुळे न्यायाच्या हिताच्या दृष्टीने सदरचा अर्ज अंशतः मंजुर होण्यास पात्र आहे. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१) अर्ज अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

२) मुद्दे नि. २० मध्ये अ.क्र. १ व ३ कडे खालीलप्रमाणे जादा मुद्दे काढण्यात येत आहेत.

1- ''Whether plaintiff proves his exclusive ownership over the suit land and houses ?''

3- '' Whether the suit is hit by law of limitation?''

३) वादी व प्रतिवादी यांना सदर मुद्दयाच्या अनुषंगाने पुरावा द्यावयाचा असल्यास पुरावा सादर करावा.

Digitally signed by ASHWINI JOTIRAM BACHULKAR
Date: 2022.08.26 12:30:24 +0530

(अ. जो. बाचुळकर )

ठिकाण : कुडाळ. दिवाणी न्यायाधीश क.स्तर,

दि. २३/०८/२०२२ कुडाळ.